महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!



महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.



महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार






छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २७२ वा | दिनांक : २६/०८/२०२५ | वार : मंगळवार


## गेवराईत लक्ष्मण हाके आणि विजयसिंह पंडितांच्या कार्यकर्त्यांमध्ये राडा



**गेवराई :** बीड जिल्ह्यातील गेवराई येथे ओबीसी नेते लक्ष्मण हाके आणि आमदार विजयसिंह पंडितांच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार घोषणाबाजी करत राडा झाल्याची माहिती समोर आली आहे. यावेळी दोन्हीकडच्या कार्यकर्त्यांनी एकमेकांवर चप्पल फेकले. लक्ष्मण हाके गेवराईत दाखल होताच हा गोंधळ झाला.

आमदार विजयसिंह पंडितांनी 'चलो मुंबई' असे बॅनर लावल्याने लक्ष्मण हाके यांच्याकडून वादग्रस्त विधान करण्यात आले होते. त्यानंतर लक्ष्मण हाके हे गेवराई येथे येताच विजयसिंह पंडितांच्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत हाकेंच्या कार्यकर्त्यांवर चपला फेकल्या तसेच हाकेंच्या कार्यकर्त्यांनी देखील चप्पल फेकल्याचे दिसून आले. यावेळी पोलिसांनी दोन्हीकडील कार्यकर्त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला.

लक्ष्मण हाके यांची गाडी गेवराई येथे येताच विजयसिंह पंडितांच्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत गाडी अडवण्याचा प्रयत्न केला. यावेळी लक्ष्मण हाके यांनी देखील गाडीवर चढत पंडितांच्या कार्यकर्त्यांना आव्हान दिले. दोन्हीकडील कार्यकर्ते आक्रमक झाल्याने काही काळ तणाव निर्माण झाला होता. यावेळी वाहतूक कोंडी देखील झाली. पोलिसांनी वेळीच धाव घेत कार्यकर्त्यांना पांगवण्याचा प्रयत्न केला.

त्यानंतर लक्ष्मण हाके यांनी पत्रकारांशी बोलताना म्हटले की, ओबीसी समाजाच्या बांधवांच्या मनात ऊर्जा निर्माण झाली पाहिजे. कोणाच्याही दहशतीखाली आम्ही राहणारे नाही आहोत. यावेळी बोलताना हाके यांनी शिवीगाळ करत म्हटले की तुमचं माणूस मुख्यमंत्र्यांना शिवीगाळ करतो. आम्ही सुद्धा मर्दाची औलाद आहोत. तुझ्या गावात आलो आहे ५०० किमी अंतरावर. तुझ्यात दम असेल तर ये, असे म्हणत हाके यांनी मनोज जरांगे यांना आव्हान दिले.

विजयसिंह पंडित यांनी या घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे. लक्ष्मण हाके हे समाजा-समाजात तेढ निर्माण करण्याचे काम करत आहेत. त्यांचे हे काम मागच्या चार दिवसांपासून बीडमध्ये चालू होते. तीन-चार दिवसांपूर्वी त्यांनी माझ्या विरोधात अतिशय खालच्या स्तराची भाषा वापरली. दंडुक्याने मारेल, असे वक्तव्य केले. त्यांच्या या प्रतिक्रियेवर मी कुठेही भूमिका मांडली नाही. पण परत परत चिथावणीखोर वक्तव्य करायचे. आता आमचे समर्थक आणि सहकारी यांची ही प्रतिक्रिया आहे. माझ्या समर्थकांनी त्या भागात जरांगे पाटील यांच्या आंदोलना संदर्भात बॅनर लावले असतील तर समाजासमाजात तेढ निर्माण होण्याचा काय प्रश्न आहे?, असा सवाल विजयसिंह पंडित यांनी केला.

## सरकार पाडण्याची भाषा करतात, पण आमदार किती : बबनराव तायवडे



**नागपूर :** मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील २९ ऑगस्ट रोजी मुंबईत आंदोलन करणार आहेत, यामुळे राजकीय आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी जरांगेवर टीका करताना म्हटले आहे की, आरक्षण मिळाले नाही तर सरकार पाडण्याची भाषा ते करत आहेत, पण त्यांच्यासोबत किती आमदार आहेत? तायवाडे यांनी जरांगे यांच्या आंदोलनावर आपले लक्ष असेल असेही सांगितले.

बबनराव तायवडे म्हणाले, सरकार उलथून टाकायचे होते तर विधानसभा निवडणुकीतून माघार का घेतली? तेव्हाच आपले उमेदवार उभे करून मोठ्या संख्येने आमदार निवडून आणायचे होते. तसे केले नाही आणि आज सरकार उलथून टाकण्याची भाषा करता. मनोज जरांगे यांच्या याच भूमिकेमुळे त्यांना कोणी गांभीर्यन घेत नाही. मराठा आरक्षणाला आमचा विरोध नाही. मात्र ओबीसीच्या आरक्षणाला धक्का लागला तर ओबीसी समाज रस्त्यावर उतरेल, असेही तायवडे यांनी म्हटले आहे.

देवेंद्र फडणवीस खुन्नस दाखवत आहेत. आजच्या दिवस प्रेमाने सांगतो. आम्हाला मुंबईला जायचं नाही. तुम्ही आरक्षण दिल्यावर, आम्हाला मुंबईला जायची गरज नाही. पण अंतरवली सोडल्यावर मी कोणत्याच मंत्र्याचे ऐकणार नाही, असे मनोज जरांगे म्हणालेत.

दोन महिन्यापूर्वी मी स्वतः देवेंद्र फडणवीस यांना फोन केला होता. मला गरीब मराठ्यांच्या वेदना तुमच्या पुढे मांडायच्या आहेत, तुम्ही अंतरवालीत या, असं मी देवेंद्र फडणवीसांना म्हणालो होतो, अशी माहिती मनोज जरांगेंनी दिली. देवेंद्र फडणवीस लक्ष घालत नसतील तर आडमुठे कोण हे मुंबईकरांनी सांगावे, असेही ते म्हणाले. तुम्ही आरक्षण न दिल्यास मी सरकारसुद्धा उलथवून टाकू शकतो...मी सोडत नसतो, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला.

## मनोज जरांगे यांना आंदोलन करताच येणार नाही : गुणरत्न सदावर्ते



**मुंबई :** मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मुद्द्यावरून आता पुन्हा एकदा राजकारण पेटल्याचे दिसत आहे. मनोज जरांगे पाटील हे २९ ऑगस्ट रोजी मुंबईतील आझाद मैदानात आंदोलन करणार आहेत. तसेच आता ही शेवटची लढाई असल्याचे त्यांनी बीडच्या सभेत म्हटले होते. परंतु, वकील गुणरत्न सदावर्ते यांनी मनोज जरांगे यांचा विरोध करत त्यांच्यावर आझाद मैदान पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

माध्यमांशी बोलताना गुणरत्न सदावर्ते म्हणाले, आझाद मैदानात आंदोलन करण्याची मनोज जरांगे यांनी परवानगी घेतली आहे का? आत्ता मी पोलिस अधिकाऱ्यांशी बोललो त्यांनी स्पष्टपणे मनोज जरांगेंच्या आंदोलनाच्या बाबतीत व उपोषणाच्या बाबतीत कोणतीही परवानगी दिलेली नाही असे सांगितले आहे. जरांगे ज्या पद्धतीने बोलत आहेत, ज्या खालच्या भाषेत बोलत आहेत, प्रत्येकाला कोणतीही प्रतिष्ठा नाही असे ते वर्तन करत आहेत. हे ठरवून केले जात आहे म्हणून आम्ही काल संध्याकाळीच पोलिस महासंचालकांना तसेच अतिरिक्त सचिव तसेच मुंबईच्या पोलिस आयुक्तांना आम्ही तक्रारी दिल्या आहेत.

पुढे बोलताना गुणरत्न सदावर्ते म्हणाले, मनोज जरांगे यांना हे आंदोलन करताच येणार नाही. उच्च न्यायालयात जेव्हा एखादे प्रकरण न्यायप्रविष्ट असते त्याविरुद्ध अशा पद्धतीने आंदोलन करणे हे अयोग्य आहे आणि चुकीचे आहे. हा न्यायालयाचा अपमान केल्यासारखे आहे. आम्ही पोलिसांना मागणी केली की त्यांनी न्यायालयात अर्ज दाखल करावा त्याचसोबत जरांगे यांच्यावर एफआयआर दाखल केला पाहिजे.

दरम्यान, गुणरत्न सदावर्ते यांनी गणेशोत्सवाच्या काळात कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, क्षमतेपेक्षा जास्त लोकांचा लोंढा मुंबईत येऊन अडथळे निर्माण होतील आणि जीडीपीवरही नकारात्मक परिणाम होऊ शकतो, असे त्यांनी आपल्या तक्रारीत नमूद केले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २६ ऑगस्ट २०२५

## कन्नड तालुकास्तरीय शालेय विद्यार्थ्यांची बुद्धिबळ स्पर्धा उत्साहात



**कन्नड (कृष्णा शिंदे):** पावसाळी क्रीडा स्पर्धा बुद्धिबळ संयुक्त विद्यमाने आयोजित १४,१७ व १९ वर्षाखालील मुला-मुलींची बुद्धीबळ स्पर्धा उत्साहात पार पडली तालुकास्तरीय बुद्धिबळ क्रीडा स्पर्धा शिवाजी महाविद्यालय येथे पार पडली यावेळी उद्धाटक म्हणून प्राचार्य विजय भोसले प्रा भाऊसाहेब मगर उदय डोंगरे क्रीडा कन्नड तालुका क्रीडा संकुल समिती सदस्य व मार्गदर्शक प्रवीण शिंदे संयोजक मुक्तानंद गोस्वामी अविनाश काळे क्रीडासंयोजन समिती यांची उपस्थिती होती.

या स्पर्धेत १४ वर्षाखालील मुलांच्या गटात आनंद ब्राह्मणे (प्रथम), कुश गवळे (द्वितीय), यदोराम काथार (तृतीय), मुलींच्या गटात इन्सा शेख (प्रथम), प्रणिता बागुल (द्वितीय), प्राची वाघ (तृतीय) १७ वर्षाखालील गटात (मुले) स्वरित पाटील (प्रथम), प्रणय शहा (द्वितीय), अनय पाटील (तृतीय) १७ वर्षाखालील मुलींच्या गटात ऐश्वर्या काळे (प्रथम), श्रद्धा गवळी (द्वितीय), गायत्री हाटकर (तृतीय), १९ वर्षाखालील मुलांच्या गटात शार्दुल धायदार (प्रथम), आदित्य पवार (द्वितीय),आयुष जवळ (तृतीय)१९ वर्षाखालील मुलींच्या गटात भाग्यश्री पवार (प्रथम), समीक्षा बिडवे (द्वितीय), विभूती लोंढे (तृतीय)या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले.

यशस्वी विद्यार्थ्यांची जिल्हास्तरावर निवड झाली. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी पंच म्हणून राकेश निकम,कडुबा चव्हाण,करण राठोड, विशाल दांडेकर राहुल दणके, वसीम शेख,अजित खंबाट, शुभम भोजने सर्व पदाधिकारी तसेच क्रीडा प्रमुख यांचे सहकार्य लाभले.

## पी.एम.श्री. जिल्हा परिषद प्रशाला लाडसावंगी येथील यश भसांडे कला उत्सव स्पर्धेत तालुक्यात प्रथम



**लाडसावंगी :** दि. २५ ऑगस्ट रोजी विद्या निकेतन येथे पार पडलेल्या तालुकास्तरीय कलाउत्सव स्पर्धेत पी.एम.श्री जिल्हा परिषद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, लाडसावंगी. ता.जि.छ. संभाजीनगर येथील चि.यश केशव भसांडे याने तालुकास्तरीय दृश्यकला स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी त्याची निवड करण्यात आली.

दि.२५ ऑगस्ट २०२५ रोजी विद्यानिकेतन,छ.संभाजीनगर येथे तालुकास्तरीय कला उत्सव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. शालेय शिक्षण व साक्षरता विभाग,शिक्षण मंत्रालय नवी दिल्ली यांच्यामार्फत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांमधील प्रतिभा ओळखून त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी कला उत्सव स्पर्धेचे आयोजन केले जाते. तालुकास्तरीय कला उत्सव स्पर्धेत प्रशाला ladsawangi च्या तब्बल १३ विद्यार्थ्यांनी विविध ५ प्रकारच्या कला प्रकारात सहभाग नोंदवला. राजू चौधरी, ओंकार नरवडे,रोहित चौधरी, रणवीर दिवांदे, आदिती मखरे, दिव्या पवार,ईश्वरी शिरोळे,दिव्या पडूळ, पल्लवी मंडावत, कार्तिक भालेराव,समाधान जोशी, यश भसांडे,आदित्य म्हस्के, या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

पैकी त्रिमितीय दृश्य कला प्रकारात यश केशव भसांडे याने तालुकास्तरावर प्रथम क्रमांक पटकावला त्याची जिल्हा स्तरावर स्पर्धेसाठी निवड करण्यात आली.विद्यार्थ्यांना श्रीमती सारीका जैन ,श्री ज्ञानेश्वर गुंजाळ यांनी मार्गदर्शन केले.यश चा औरंगाबाद पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी मा.श्री. चेतन कांबळे साहेब, शिक्षणविस्तार अधिकारी श्रीम.वाशिंबे मॅडम, श्रीमती पदकोंडे मॅडम, श्री. कांबळे सर,श्रीमती भोळे मॅडम,श्रीमती मोरे मॅडम,श्री काकडे सर तथा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.प्रशालेचे मुख्याध्यापक श्री गोरखनाथ नजन, तथा सर्व शिक्षकवृंदांनी अभिनंदन केले.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिंग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिंग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

## आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेत्यांचा महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षामध्ये प्रवेश व पदनियुक्ती घोषित करण्यात आल्या





**छत्रपती संभाजीनगर:** महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या छत्रपती संभाजी नगर औरंगाबाद जिल्हा सहसचिव पदी आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते रमेश उमप तर कैलास साखरे यांची जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली व नंदकिशोर तिडके यांची शहर उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली.

अमोल राजगुरू यांची युवक शहराध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली,व महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहुल जी. वडमारे यांनी त्यांना नियुक्तीचे पत्र दिले.महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यासाठी राहुल जी. वडमारे २४/०८/२०२५ रोजी सुभेदारी विश्रामगृह दिल्ली गेट छत्रपती संभाजी नगर औरंगाबाद येथे बैठक घेण्यात आली. या आढावा बैठकीत जिल्हाध्यक्ष राहुल वडमारे यांनी सर्व नवनिर्वाचित पदाधिकारी व उपस्थित पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी यांना येणाऱ्या काळात महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाची बांधणी मजबूत कशी करायची गाव तेथे शाखा व येणाऱ्या आगामी निवडणुकी संदर्भात सखोल चर्चा करून निवडणूक लढण्याची तयारी सुरू करा असे सांगितले आहे, व या सर्व बाबींवर सखोल चर्चा केली व या बैठकी दरम्यान या नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहुल जी.वडमारे यांच्या हस्ते नवीन पदाधिकाऱ्यांना नियुक्तीची पत्रे देण्यात आले. यावेळी पक्षाचे जिल्हा संघटक रतन जाधव यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला यावेळी प्रमुख उपस्थिती, जिल्हा सचिव बापूसाहेब चाबुकस्वार , हिरालाल जैयस्वाल शहराध्यक्ष व .. ज्येष्ठ नेते महेंद्र गवई यांची होती बंडू तांदळे, सिद्धार्थ सोनवणे पैठण तालुका अध्यक्ष भानुदास चाबुकस्वार पैठण शहराध्यक्ष , पंकज कोतकर, पोपट निवृत्ती जाधव, अमोल घुसाळ, विलास महालकर, कैलास साखरे, बाबासाहेब ससाने, प्रभाकर शहाराव,अनिल इंगळे, अमित देशमुख, मुकेश मकासारे, मनोज पगारे, विकास तायडे आदींची उपस्थिती होती.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २६ ऑगस्ट २०२५


## येणारा काळ महाविकास आघाडीचाच असणार : महादेव जानकर



**दौलताबाद (जावेद अहेमद) :** महाविकास आघाडीतील प्रमुख घटक पक्ष राष्ट्रीय समाज पक्षाचे चे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी मंत्री महादेव जानकर यांनी दौलताबाद येथे भेट दिलीएका खाजगी कामा निमित्त महादेव जानकर छत्रपती संभाजीनगर येथे आले होते, या निमित्ताने त्यांनी दौलताबाद येथे भेट दिली. याभेटीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अल्पसंख्यांक जिल्हा कार्याध्यक्ष सैय्यद लायकोद्दीन यांनी जानकर यांच्याशी आगामी निवडणुकी संदर्भात चर्चा केली.

या भेटी दरम्यान महादेव जानकर येणाऱ्या सर्व निवडणुका महाविकास आघाडी सोबत लढवणार असल्याचे सांगितले.व येणारा काळ हा महाविकास आघाडी चा असणार असल्याचे सांगितलेयावेळी उद्योजक कदीर खान,काँग्रेस महासचिव महाराष्ट्र मोहम्मद जाकीर,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अनवर नवाब, सैय्यद जुनेद ,शेख शकील उपस्थित होते.

## विद्यापीठाच्या जिल्हा समन्वयकपदी डॉ.राम कदम यांची निवड



**उमरगा (प्रा. नागगसेन कांबळे)** : तालुक्यातील गुंजोटीच्या श्रीकृष्ण महाविद्यालयात भौतिकशास्त्र विभागात कार्यतत्पर असलेले हरहुन्नरी प्रा.डॉ.राम कदम यांची डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने नुकतीच विद्यापीठाच्या वतीने दरवर्षी घेण्यात येणाऱ्या आविष्कार स्पर्धेसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाच्या जिल्हा समन्वयक पदी नियुक्ती केली,तशा आशयाचे नुकतेच पत्र विद्यापीठाकडून प्राप्त झाले असून ,येत्या सप्टेंबर महिन्यात आविष्कार स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे.

डॉ.राम जाधव हे अत्यंत शांत स्वभावाचे असून ते भौतिकशास्त्राचे संशोधक मार्गदर्शकही आहेत,त्यांच्याकडे अनेक विद्यार्थी संशोधन करीत आहे.डॉ.राम कदम यांच्या एकूणच कार्याची दखल घेत विद्यापीठाने त्यांच्यावर अतिशय महत्त्वाची अशी महाविद्यालयीन समन्वयकाची ऑनलाईन नोंदणी तसेच स्पर्धा जागृतीपर कार्यशाळा व नवनवीन संकल्पना सुचविण्याची ,राबविण्याची जबाबदारी देण्यात आली आहे.

मनमिळाऊ स्वभाव व कल्पक व्यक्तिमत्व यामुळे निश्चितच यावर्षीचा आविष्कार स्पर्धेचा सोहळा आगळा वेगळा ठरणार आहे.या निवडीबद्दल सर्वच स्तरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत असून सर्वश्री महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गुलाब राठोड ,श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. दामोदर पतंगेकाका,संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती विभावरीताई शाईवाले , उपाध्यक्ष श्री.प्रभाकर तात्या हिरवे तथा महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103


## शालेय तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धा



**दौलताबाद (जावेद अहेमद)** : दि. 25/08/3025 शालेय तालुका स्तरीय बुद्धिबळ स्पर्धा क्रिडा व युवक सेवा संचनालय पुणे जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर आणि अंजना स्कूल ऑफ एक्सलेन्स यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय तालुका स्तरीय बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष रामकृष्ण मायंदे गंगापूर तालुका क्रिडा अधिकारीप्रमुख उपस्थिती पर्यटन उपसांचालनालय पर्यटन सहाय्यक शिवाजी गायकवाड, शेख शफी क्रीडा संयोजक,कैलास जाधव, निलेश माने, देविदास साठे, आकाश इंगळे क्रिडा शिक्षक,पंच सी के जाधव,अनिल शेरे,देविदास जैस्वाल, संदीप कुमावत, विठ्ठल धोडपकर व सर्व शिक्षक उपस्थित होतेया बुद्धीबळ स्पर्धेत तालुक्यातील विविध शाळा व महाविद्यालयात च्या 213 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता यात 19 वयोगटातील 48 विद्यार्थी, 17 वयोगटातील 21 विद्यार्थी, 14 वयोगटातील 57 विद्यार्थ्यांनी भाग घेतला होतास्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडू ला पदक व प्रमाणपत्र सोबत प्रत्येकाला एक एक वृक्ष देण्यात आलेआज मुलांची स्पर्धा घेण्यात आली उद्या बजाजनगर येथील शाळेत घेण्यात येणार असल्याचे रामकृष्ण मायंदे यांनी सांगितले

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २६ ऑगस्ट २०२५


## उमरगा बँकेने आरबीआयच्या सर्व निकषांचे पालन करुन सर्वसामान्यांचा विश्वास संपादन केला : शरण पाटील




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : उमरगा बँकेने आरबीआयच्या सर्व निकषांचे पालन करुन सर्वसामान्यांचा विश्वास संपादन केला आहे. सोने तारण, सोलार कर्ज, वाहन कर्ज, गृह कर्ज, व्यवसाय कर्ज, मराठा तरुणांना व्यवसायासाठी आण्णासाहेब पाटील महामंडळ अंतर्गत कर्ज माफक व्याजदराने वाटप करण्यात येत आहे. चालू आर्थिक वर्षात शुन्य टक्के एनपीए करण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवण्यात आले असुन याला सर्व सभासदांनी सहकार्य करावे. सभासदांना 7 टक्के लाभांश देण्यात येणार आसल्याची घोषणा चेअरमन शरण बसवराज पाटील यांनी केले.

उमरगा जनता सहकारी बँकेची 29 वी वार्षिक सर्वसाधारण सभा बँकेचे चेअरमन शरण बसवराज पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (दि.25) उमरगा येथे अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. यावेळी व्यासपीठावर काशी, श्रीशैल्यम व उजैन पिठाचे विश्वस्त तथा जिल्हा बँकेचे चेअरमन बापुराव पाटील, उमरगा जनता बँकेचे व्हा. चेअरमन अॅड. विरसंगप्पा आळंगे, माजी चेअरमन रामकृष्णपंत खरोसेकर, माजी उपाध्यक्ष अॅड. प्रदिप पणुरे, विठ्ठलसाई कारखान्याचे कार्यकारी संचालक सुरेश गवसाने, बँकेचे संचालक डॉ. दिलीप गरुड, मदन पाटील, रफिक तांबोळी, अॅड. संजय बिराजदार, विनय बदोले, भरत मारेकर, अण्णाराव कांबळे, वनिता कारभारी, मुख्य कार्यकारी अधिकारी अमित भरडे, बलभिम पाटील, प्राचार्य डॉ. राम सोलनकर, शिवलिंग माळी, माजी नगराध्यक्ष रशीद शेख, पंकज खरोसेकर, गौस शेख, माजी सभापती सचिन पाटील, अनिल सगर, योगेश राठोड, प्रताप पाटील, महालिंग बाबशेट्टी, महेश माशाळकर, चंद्रशेखर पवार, यशपाल कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना श्री पाटील म्हणाले की, चैतन्यमुर्ती माधवराव काका पाटील यांच्या संकल्पनेतून उभारलेल्या उमरगा जनता बँकेने बसवराज पाटील यांच्या नेतृत्वाखाली व जिल्हा बँकेचे चेअरमन बापुराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली इवल्याशा रोपट्याचा वटवृक्षात रुपांतर झाले आहे. धाराशिव, लातुर, सोलापूर जिल्हयात बँकेच्या शाखा आहेत. बँकेचा विस्तार करणेसाठी आपण प्रयत्नशील असुन लातुरला नविन शाखा लवकरत सुरु करत आहोत. बँकेकडे क्यु आर कोडची सुविधा आहे. सभासदांनी जागृत होऊन वेळेवर कर्जाची परतफेड करणे गरजेचे आहे. बँकेकडे 225 कोटींच्या ठेवी आहेत.

सभासदांचे भागभांडवल 8 कोटी 35 लाख, राखीव निधी 22 कोटी 20 लाख, सभासदांना 115 कोटीचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. बँकेचा 4 कोटी रुपयाचा ढोबळ नफा, खेळते भांडवल 266 कोटी 68 लाख रुपये, गुंतवणूक 135 कोटी 24 लाख रुपये आहे. बँकेच्या ठेवीमध्ये सातत्याने वाढ होत असून हे ग्राहकांच्या विश्वासाचे प्रतीक असल्याचे चेअरमन शरण बसवराज बसवराज पाटील यांनी सांगितले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

यावेळी सर्व संचालक, शाखाधिकारी, सभासद, ठेवीदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. व्हा. चेअरमन अॅड. व्ही. एस. आळंगे यांनी प्रास्ताविक करुन अहवाल वाचन केले. शौकत पटेल यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन करुन श्रध्दांजलीचा ठराव मांडला तर संचालक भरत मारेकर यांनी आभार मानले.




## म्हणून हे असं?

आयुष्याचा हिशोब कधी जमलाच नाही
अडाणी विदूषक राहिलो म्हणून हे असं ?

पैशांचा व्यवहार कधी समजलाच नाही
विरक्त भोळेपणात जगलो म्हणून हे असं ?

प्रेम मनातच उचंबळत राहिल
मिलन तिच्याशी झाल नाही म्हणून हे असं ?

स्वार्थ कधी पाहीलाच नाही
इतरांच्या आनंदात आनंदी झालो म्हणून हे असं ?

मरुनही मरण आलचं नाही
ब्रम्हांडात लीन होऊन अमरत्व आलं म्हणून हे असं ?



**कवी. संजय मुकुंद निकम**
मालेगाव जि. नासिक महाराष्ट्र
८६५७४ ८८४२६

## निधन वार्ता



**गंगापूर (जावेद अहेमद)** : ह.भ.प. यादव काका महाराज गुरुवर्य ह.भ.प. यादव काका महाराज आसेगांवकर वय.86 रा.आसेगाव ता.गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर) यांचे (दि.25 सोमवारी रोजी सकाळी 7 वाजता वृद्धपकाळाने निधन झाले.त्याच्यावर दि,25 सोमवारी दुपारी 4 वाजता आसेगाव येथील स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी जिल्ह्यातील व परजिल्हातून अनेक संत महंत हरिभक्त पारायण चे विस्वस्त मंडळाचे अध्यक्ष सदस्य वारकरी संप्रदायाचे लोक मोठ्या उपस्थित होते देवगिरी एका जनार्दनी संत सेवा आश्रमाचे अधिष्ठान चे सचिव होते.